**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या ५ व्या टप्प्यातल्या मतदारसंघांमध्ये अर्जांची छाननी पूर्ण

- भाजपा सत्तेवर आहे असेपर्यंत SC, ST आणि ओबीसींचं आरक्षण कोणीही हिरावून घेऊ शकत नसल्याची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची स्पष्टोक्ती

- कांदा निर्यातीला केंद्राची सशर्त परवानगी, अनेक ठिकाणी कांद्याच्या दरात वाढ

**आणि**

- वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठीची राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा उद्या

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातल्या उमेदवारांच्या अर्जांची छाननी आज झाली. धुळ्यामधून ३० पैकी २२ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अब्दुर रहमान यांच्यासह एकूण ८ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले. अब्दुर रहमान हे १९९७ च्या तुकडीचे भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी आहेत. रहमान यांच्या सरकारी सेवेतला राजीनामा अजून मंजूर झालेला नाही. त्यामुळं त्यांचा अर्ज अवैध ठरला. या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचं ते म्हणाले. **कल्याण** लोकसभा मतदारसंघातून ३० जणांचे अर्ज वैध ठरले असून ४ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले. **नाशिकमधून** ३९ पैकी ३ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले. दिंडोरी लोकसभा मतदारसंघातून २० पैकी ५ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले. त्यात MIM कडून अर्ज भरलेल्या दोघांचा समावेश आहे. **राज्यातल्या** १३ मतदारसंघात एकूण ३९७ उमेदवारांचे ५१२ अर्ज दाखल झाले होते. पाचव्या टप्प्यातल्या १३ मतदारसंघांमध्ये अर्ज मागे घेण्यासाठी सोमवारपर्यंत मुदत आहे.

**<><><><><><>**

वायव्य मुंबई मतदारसंघातून २८ तर ईशान्य मुंबई मतदारसंघातून २० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. ईशान्य मुंबईतून बहुजन समाज पक्षाकडून नंदेश उमप यांनी भरलेला अर्ज वैध ठरला आहे. भिवंडीतून ३६ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले असून ५ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरलेत. **<><><><><><>**

काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाच्या नेतृत्वाखालील सरकारांनी बिहारचे भविष्य उद्ध्वस्त केल्याचा आरोप प्रधानमंत्री आणि भाजपचे वरिष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज केला. बिहारमधल्या दरभंगा राज मैदानावर जाहीर सभेला संबोधित करताना ते बोलत होते. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि राजद नेते तेजस्वी प्रसाद यादव यांनी सादर केलेलं रिपोर्ट कार्ड त्यांच्या सरकारच्या भ्रष्टाचार आणि अनाचाराची आठवण करून देतं, असा दावा त्यांनी केला. राजदच्या काळात अपहरण हा उद्योग झाला होता. जनतेचा पैसा लुटला गेला होता, असा आरोप मोदी यांनी केला. तुष्टीकरणाच्या राजकारणासाठी इंडिया आघाडीला ओबीसींचा कोटा कमी करायचा आहे, असा दावा त्यांनी यावेळी केला.

**<><><><><><>**

आरक्षण हे अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांचा  घटनात्मक अधिकार असून जोपर्यंत भाजपा सत्तेवर आहे तोपर्यंत हा अधिकार  कोणीही हिरावून घेऊ शकत नाही, असं भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले. काँग्रेस पक्ष आरक्षणाच्या मुद्द्यावरून राजकारण करत आहे, असा आरोप त्यांनी केला. ते आज गुजरातमध्ये छोटा उदेपूर आणि वासंदा इथल्या जाहीरसभेत बोलत होते. समाजातल्या सर्व घटकांचा विकास करण्यासाठी भाजपा वचनबद्ध आहे, भाजपाच्या कार्यकाळात आदिवासी समाजातली महिला राष्ट्रपती पदावर विराजमान झाल्या, असं शाह यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

केंद्र सरकारनं केवळ अब्जाधीशांच्या फायद्यासाठीच काम केलं असून श्रीमंत उद्योगपतींचे सोळा लाख कोटी रुपये माफ केले. मात्र,शेतकऱ्यांचं कर्ज माफ केलं नाही, असा आरोप काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी केला. कर्नाटकातल्या दावणगेरे इथल्या जाहीर सभेत त्या आज बोलत होत्या. नोटाबंदी आणि जीएसटीनं छोटे उद्योग तसंच व्यापाऱ्यांचं कंबरडे मोडलं असल्याचा आरोपही त्यांनी केला.

<><><><><>

ओडिशाच्या पुरी लोकसभा मतदारसंघातल्या काँग्रेसच्या उमेदवार सुचरिता मोहंती यांनी उमेदवारी नाकारली आहे. काँग्रेसकडून आर्थिक मदत मिळत नसल्याचा दावा त्यांनी केला. आयकर विभागानं काँग्रेसची बँक खाती गोठवल्यानं त्यांनी निवडणुकीसाठी लोकांकडून देणग्या मागितल्या होत्या. पुरी लोकसभा मतदारसंघातून भाजपचे प्रवक्ते संबित पात्रा आणि बिजू जनता दलाचे नेते आणि माजी IPS अधिकारी अरुप पटनायक निवडणूक लढवत आहेत.

<><><><><>

वाढती महागाई आणि बेरोजगारीमुळे देशातली जनता अडचणीत आली असल्याचा आरोप बहुजन समाज पक्षाच्या अध्यक्ष मायावती यांनी आज केला. त्या आग्रा लोकसभा मतदार संघातल्या पक्षाच्या उमेदवार पूजा अमरोही यांच्या समर्थनासाठी घेतलेल्या सभेत त्या बोलत होत्या. भाजपच्या चुकीच्या आर्थिक धोरणांचा फटका लहान आणि मध्यमवर्गीय व्यावसायिकांना बसला आहे. काँग्रेस आणि भाजप दोन्ही पक्ष अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांना आरक्षण देण्याच्या विरोधात असल्याची टीका त्यांनी या वेळी केली.

<><><><><>

काँग्रेसचे दिल्लीतले माजी प्रदेशाध्यक्ष अरविंदर सिंग लवली यांनी आज नवी दिल्लीत भाजपामध्ये प्रवेश केला. पक्षाचे सरचिटणीस विनोद तावडे आणि केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यावेळी उपस्थित होते. दिल्लीचे माजी मंत्री राजकुमार चौहान, काँग्रेसचे माजी सचिव नसीब सिंग, माजी आमदार नीरज बसोया आणि नॅशनल स्टुडंट युनियन ऑफ इंडियाचे माजी प्रमुख अमित मलिक यांनीही आज भाजपामध्ये प्रवेश केला.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात उद्याच्या भागात आपण पुणे आणि शिरुर लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

कांदा निर्यातीवरची बंदी केंद्र सरकारनं हटवली आहे. मात्र निर्यातीसाठी प्रति टन ५५० अमेरिकन डॉलर्स किमान भाव आवश्यक राहील, असं स्पष्ट केलं आहे. त्याचबरोबर कांदा निर्यातीवर ४० टक्के शुल्कही लावलं आहे. कांदा निर्यातीवरची बंदी हटवण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचं नाशिकसह राज्यातल्या शेतकऱ्यांनी स्वागत केलं आहे. निर्यात बंदी उठवताच प्रमुख बाजार समित्यांमध्ये कांद्याचे भाव वाढले आहेत. लासलगाव मधे आज सकाळच्या लिलावात किमान ८०१ ते कमाल २ हजार ५५१ रुपये प्रति क्विंटल भाव मिळाला. त्यामुळे कांदा उत्पादकांमध्ये समाधानाचं वातावरण असल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे. कोणत्याही अटी- शर्तींशिवाय निर्यात सुरू करावी, अशी मागणी कांदा उत्पादक संघटनेनं केली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज पासून ५ दिवस हिमाचलप्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. शिमला इथं कल्याणी हेलिपॅडवर हिमाचल चे राज्यपाल शिवप्रताप शुक्ला आणि मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांनी त्यांचं स्वागत केलं. त्यानंतर राष्ट्रपतींनी पारंपरिक मानवंदना स्वीकारली. माशोब्रा इथल्या राष्ट्रपती निवासात मुर्मू यांचा मुक्काम असणार आहे. त्यादृष्टीनं आसपासच्या परिसरात सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठीची 'नीट' म्हणजे राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा उद्या होणार आहे. २४ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली आहे. देशभरातल्या ५७ आणि भारताबाहेरच्या १४ शहरात ही परीक्षा होईल. संयुक्त अरब अमिराती मधल्या अबुधाबी, दुबई आणि शारजाह या शहरांमधल्या केंद्रांवर नीट परीक्षा घेण्यात येणार आहे. भारतीय वेळेनुसार दुपारी दोन वाजता परीक्षेला सुरुवात होईल.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात काल भारतातल्या ३ महिला प्रतिनिधींनी सादरीकरण केलं. त्यात त्रिपुरातल्या सुप्रिया दास दत्त, आंध्रप्रदेशमधल्या कुनुकू हेमा कुमारी आणि राजस्थानच्या नीरु यादव यांचा समावेश होता. त्यांनी महिला आणि मुलींना सक्षम करण्यासाठी हाती घेतलेल्या प्रकल्पांची माहिती जगभरातल्या प्रतिनिधींना दिली. बालविवाहाला प्रतिबंध, शिक्षणाला प्रोत्साहन, आर्थिक समावेशन, उपजीविकेच्या संधी, पर्यावरणीय शाश्वतता आणि क्रीडा क्षेत्रात त्यांनी काम केलंय. संयुक्त राष्ट्रांच्या लोकसंख्या आणि विकासविषयक आयोगाच्या ५७ व्या बैठकीचा भाग म्हणून या पंचायत राज मंत्रालयाच्या सहकार्यातून या कार्यक्रमाचं आयोजन झालं होतं. देशातल्या १४ लाखांहून अधिक लोकनियुक्त महिला

प्रतिनिधींच्या समावेशामुळे देशाच्या प्रगतीच्या वेगात वाढ झाल्याची माहिती संयुक्त राष्ट्रातल्या भारताच्या स्थायी प्रतिनिधी रुचिरा कंबोज यांनी दिली.  केंद्रीय पंचायती राज मंत्रालयाचे सचिव विवेक भारद्वाज यांनी “ड्रोन दीदी” आणि “लखपती दीदी” यांसारख्या उपक्रमांचं  उदाहरण दिलं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात लढत सुरू आहे. बेंगळुरूत सुरू असलेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा गुजरात टायटन्सच्या ७ षटकात ३ बाद ३४ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

हाॅकी इंडियानं युरोप दौऱ्यावर जाणाऱ्या कनिष्ठ पुरुष हॉकी संघाची आज घोषणा केली. कनिष्ठ पुरुष हॉकी संघ २० ते २९ मे दरम्यान युरोप दौऱ्यावर जाणार असून या कालावधीत ते बेल्जियम, जर्मनी आणि नेदरलँड या देशातील संघांविरुद्ध पाच सामने खेळणार आहेत. बचावपटू रोहित या संघाचा कर्णधार असून शारदानंद तिवारी याची उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे. कनिष्ठ पुरुष संघाला इतर देशातील संघांशी खेळण्याचा अनुभव मिळावा, यासाठी हॉकी इंडियानं या दौऱ्याचं आयोजन केलं आहे.

**//<><><><><>//**